# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः30.03.2024** **वारःशनिवार**

---

1. गव्हाची साठेबाजी रोखण्यासाठी गहू साठ्याची नोंद करण्याचे केंद्राचे व्यापाऱ्यांना आदेश
2. निवडणूक आयोगाच्या सी व्हिजिल या ॲपवर सुमारे 79 हजार तक्रारींची नोंद
3. मतदार जनजागृतीसाठी राज्यात विविध अभिनव उपक्रमांचं आयोजन
4. माजी राज्यमंत्री आणि शेकापच्या नेत्या मीनाक्षी पाटील यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार आणि
5. राज्यात काही ठिकाणी पावसाचा इशारा मात्र सर्वत्र उष्मा कायम

**गहू**

गव्हाच्या साठेबाजीवर आळा घालून बाजारभाव नियंत्रणात राहावे यासाठी गव्हाच्या साठ्याची नोंद करण्याचे आदेश केंद्र सरकारनं व्यापाऱ्यांना दिले आहेत. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातले गव्हाचे किरकोळ आणि घाऊक विक्रेते, रिटेल चेन, तसंच गव्हावर प्रक्रिया करणारे या सर्वांनी आपल्या जवळच्या गव्हाच्या साठ्यांची नोंद करावी, असं ग्राहक व्यवहार आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं म्हटलं आहे. यासाठी प्रत्येकाने सरकारी पोर्टलवर नोंदणी करून दर शुक्रवारी आपल्याजवळच्या साठ्याची माहिती देणं बंधनकारक करण्यात आलं आहे. तांदळाच्या साठ्यांची नोंद करणं यापूर्वीच बंधनकारक करण्यात आलं असून त्यासंबंधी माहिती घेण्याचं काम सध्या सुरु आहे.

**सीविजील**

भारत निवडणूक आयोगानं लोकसभेच्या निवडणुकांची घोषणा केल्यानंतर आचारसंहिता लागू झाली आहे. निवडणूक आयोगानं आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचा तातडीने निपटारा करण्यासाठी C-Vigil हे मोबाईल ॲप विकसित केलं आहे. एखाद्या ठिकाणी आचारसंहितेचा भंग होत असल्याचं निदर्शनास आल्यास त्या प्रसंगाचं छायाचित्र किंवा व्हिडिओ काढून या ॲपमध्ये तक्रार नोंदविता येणार आहे. त्यावर जिल्हा प्रशासन तसेच मुख्य निवडणूक कार्यालयाकडून तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे.

सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्यापासून आजपर्यंत या ॲपवर 79 हजारांहून अधिक तक्रारी आल्या असून यापैकी 99 टक्क्यांपेक्षा अधिक तक्रारींचं निराकरण करण्यात आलं आहे. गती आणि पारदर्शकता ही या ॲपची वैशिष्ट्य आहेत. आतापर्यंत नोंदवलेल्या तक्रारींपैकी एकंदर 73 टक्के तक्रारी या बेकायदेशीर होर्डिंग्ज आणि बॅनर्सच्या विरोधात आहेत. तर पैसे, भेटवस्तू आणि दारू वाटपाच्या संदर्भात चौदाशेहून अधिक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. धमकावल्याच्या किंवा बेकायदेशीररीत्या ध्वनीक्षेपक वापरल्याच्या तक्रारीही आल्या आहेत.

C-Vigil नागरिकांना जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक अधिकारी आणि भरारी पथकांशी संपर्क साधण्यास मदत करते. C-Vigil ॲपवर तक्रार नोंदवताच तक्रारदाराला एक युनिक आयडी मिळतो, ज्याद्वारे तक्रारदार व्यक्ती आपल्या मोबाईलवरून तक्रार निवारण प्रक्रियेचा पाठपुरावा करू शकते.

**रामटेक-बर्वे**

रामटेक लोकसभा मतदारसंघात रश्मी बर्वे यांचं जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीनं अवैध ठरवल्यानंतर कॉंग्रेस पक्षाकडून पर्यायी उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केलेले श्यामराव बर्वे यांचं नाव आता पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून

जाहीर करण्यात आलं आहे. दरम्यान, रश्मी बर्वे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडे धाव घेतली आहे. जात पडताळणी समितीच्या निर्णयाला त्यांनी आव्हान दिलं असून खंडपीठानं या प्रकरणाची सुनावणी 1 एप्रिल रोजी ठेवली आहे.

**<u>उमेदवार-अमरावती</u>**

अमरावती लोकसभा मतदारसंघात प्रहार पक्षाच्या वतीनं माजी नगरसेवक दिनेश बूब यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. इथे महायुतीच्या वतीनं विद्यमान खासदार नवनीत राणा यांचं तर महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून काँग्रेस पक्षाचे विद्यमान आमदार बळवंत वानखडे यांचं नाव जाहीर करण्यात आलं आहे. वंचित बहुजन आघाडीच्या वतीनं प्राजक्ता पिल्लेवान यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. आता महायुती मधील गटपक्ष असलेल्या प्रहार पक्षानं बूब यांची उमेदवारी जाहीर केल्यामुळे इथे चौरंगी लढतीची शक्यता वर्तवली जात आहे.

**<u>पाटील-सातारा</u>**

साताऱ्याचे विद्यमान खासदार श्रीनिवास पाटील यांनी प्रकृती अस्वास्थाच्या कारणावरून निवडून लढविण्यास नकार दिला आहे. यामुळे महाविकास आघाडीकडून संभाव्य नावांची चर्चा सुरु असून चर्चेनंतर उमेदवाराचं नाव जाहीर करण्यात येईल, अशी माहिती खासदार शरद पवार यांनी काल साताऱ्यात पत्रकार परिषदेत दिली. साताऱ्याची जागा राष्ट्रवादी कॉंगेस शरदचंद्र पवार पक्षाचीच असून ती याच पक्षाची राहिल, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<u>निलेश लंके-अहमदनगर</u>**

अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार निलेश लंके यांनी काल अखेर आमदारकीचा राजीनामा दिला. विधानसभा अध्यक्षांना आपण राजीनामा पाठवत असून शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली अहमदनगर मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. सुपा इथं कार्यकर्त्यांच्या मेळाव्याला संबोधित करताना ते बोलत होते.

**<u>मतदान जनजागृती</u>**

निवडणूक आयोगाकडून मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याला नागरिकही उत्साहानं साथ देत असून नाविन्यपूर्ण उपक्रम ठिकठीकाणी राबवले जात आहेत. ऐकुया अशाच काही अभिनव उपक्रमांविषयी...

**आई बाबा आमचा एवढा हट्ट पुरवा, न चुकता मतदान करा, असं आवाहन धाराशिव तालुक्यातल्या गोवर्धनवाडी इथल्या जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतल्या विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडिलांना पत्रातून केलं आहे. मुख्याध्यापक सचिन हुलसूरकर यांच्या मार्गदर्शनात हा अभिनव उपक्रम राबवला गेला.**

**लातूर शहर मतदारसंघामध्ये सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांच्या पुढाकारातून 307 शाळांमध्ये पालक मेळावे आयोजित करण्यात आले होते. या मेळाव्यातून विद्यार्थ्यांमार्फत पालकांना आगामी लोकसभा निवडणुकीत मतदानात सहभागी होण्याचं आवाहन करण्यात आलं. सर्व विद्यार्थ्यांमार्फत आई-वडिलांना पत्र देऊन पालकांकडून मतदान करण्याबाबतचं संकल्पपत्र भरून घेण्यात आलं.**

**हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी तालुक्यात कवडा इथं मातोश्री क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदिवासी विद्यालय या शाळेतले कलाशिक्षक दिलीप दारव्हेकर यांनी रांगोळीच्या माध्यमातून मतदान जनजागृती मोहीम राबवली.**

**पुण्यातील आकुर्डीच्या प्राध्यापक रामकृष्ण मोरे महाविद्यालयात नवमतदार विद्यार्थ्यांनी मतदानाची शपथ दिली. आकाशवाणी बातम्यांसाठी आमच्या ठिकठीकाणच्या वार्ताहरांसह मेघना देशपांडे पुणे.**

**<u>गुड फ्रायडे</u>**

येशू ख्रिस्ताचं बलिदान आणि करुणा याची आठवण जागवत ख्रिस्ती समाजाकडून काल गुडफ्रायडेचं पालन भक्तिभावानं करण्यात आलं. चर्चमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम आणि प्रार्थना सभांचं आयोजन करण्यात आलं होतं. अनेक ठिकाणी येशू ख्रिस्तांच्या सजीव देखाव्यासह शोभायात्रा काढण्यात आली. यात ख्रिस्ती बांधव मोठ्या संखयेनं सहभागी झाले होते.

**<u>ग्रंथोत्सव-सिंधुदुर्ग</u>**

ग्रंथोत्सव हे प्रदर्शन नसून आपल्याला नवीन दिशा देणारा उत्सव आहे. जास्तीत जास्त वाचकांनी ग्रंथ वाचन करावं, असं आवाहन कुडाळचे तहसीलदार वीरसिंग वसावे यांनी काल सिधुदुर्ग जिल्ह्यातल्या कुडाळ इथं केलं. राज्याचा उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या ग्रंथोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. दोन दिवसांच्या या ग्रंथोत्सवात ग्रंथप्रदर्शन, विक्री, व्याख्यान, परिसंवाद, कथाकथन यांच आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>निधन-रायगड</u>**

माजी राज्यमंत्री आणि शेकापच्या नेत्या मीनाक्षी पाटील यांचं काल सकाळी दीर्घ आजारानं निधन झालं. त्या 76 वर्षांच्या होत्या. मीनाक्षी पाटील यांनी दोन वेळा अलिबाग विधानसभा मतदार संघाचं विधानसभेत प्रतिनिधीत्व केलं होतं. विलासराव देशमुख यांच्या मंत्रिमंडळात त्या राज्यमंत्री होत्या. रायगड जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या त्या अध्यक्ष होत्या. पाटील यांच्या पार्थिव देहावर काल दुपारी पेझारी इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

**<u>पाऊस-नाशिक, धुळे</u>**

नाशिक जिल्ह्यात कडक उन्हाचा तडाखा बसत असतानाच काल मालेगाव, सिन्नरसह चांदवड तालुक्यात सकाळी पावसाच्या सरी कोसळल्या. काही भागात काढणीस आलेला गहू, हरभरा भिजल्याने शेतकऱ्यांची धावपळ उडाली. जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा पारा 37 अंश सेल्सिअसच्या वर गेला आहे. धुळे शहर आणि परिसरात काल पावसाच्या सरी पडल्या. उकाड्याने हैराण झालेल्या धुळेकारांना या पावसामुळे काही अंशी गारवा मिळाला असला तरी या अवकाळी पावसामुळे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असल्यानं शेतकरी चिंतेत सापडले आहेत.

**<u>हवामान</u>**

राज्यात परभणी इथं काल सर्वाधिक 41 पूर्णांक 6 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. येत्या 24 तासात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही तुरळक ठिकाणी वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह हलक्या पावसाचा अंदाज आहे. रात्रीच्या वेळी मात्र उष्मा चांगलाच राहील

# आकाशवाणी पुणे केंद्रावचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.